# विधानसभा निवडणूक आणि पक्षीय संदर्भ

**प्रिया गणपत पोवार,**
संशोधक विद्यार्थिनी,(राज्यशास्त्र विभाग),शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

..................................................................................................................................................

**प्रस्तावना :**

भारतामध्ये लोकशाही शासनप्रणाली बऱ्याच काळापासून अस्तित्वात आहे. देशाच्या राज्यकारभाराची एक उत्तम पध्दती म्हणून लोकशाही शासनपध्दतीचा उल्लेख केला जातो. प्रतिनिधीक लोकशाही राज्यात राजकीय पक्षांना अत्यंत महत्वाचे स्थान आहे. तसेच राजकीय पक्षांना महत्वपूर्ण भूमिका पार पाडावी लागते. लोकशाही शासनपध्दतीमध्ये जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधेमार्फत राज्यकारभार चालतो. जनतेच्या संमतीतून (Consent) आणि टीकेतून (Critisim) लोकशाहीचा कारभार चालतो. स्वयंफूर्तीने निर्माण झालेल्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतीक इ. विविध क्षेत्रांमधील संघटनांमध्ये नियमित निवडणूका घेणे देशाचे संविधान लोकनुवर्ती शासनेला किती महत्व देते. तसेच लोकांना शासनात सहभागी करून घेण्याचे विविध मार्ग सातत्याने स्विकारले जातात. लोकशाही राज्यात द्विपक्षपध्दती किंवा बहुपक्षपध्दती असते. ( इंग्लड, अमेरिका) या देशात द्विपक्षपध्दती किंवा बहुपक्षपध्दती आहे. राज्यात सत्ताधारी भाजप, शिवसेना, कॉग्रेस आणि राष्ट्वादी कॉग्रेस हे मुख्य पक्ष आहेत. तसेच मनसे आणि वंचित बहुजन आघाडी यांचा काही ठिकाणी प्रभाव आहे. भारतात राष्ट्रीय पातळीवर तसेच प्रादेशिक स्वरूपाचे विविध राजकीय पक्ष कार्य करताना दिसतात.

**उद्दीष्टये :**

१)राजकीय पक्षांचे स्वरूप व महत्व समजावून घेणे.
२)बदलत्या राजकीय पक्षांचा स्वरूपाचा अभ्यास करणे.
३)राजकरणांवर प्रभाव टाकणारे विविध पक्षांची भूमिका समजावून घेणे.

## १)भारतीय निवडणूक आयोग :

भारतीय निवडणूक आयोग ही भारतसरकारच्या अखत्यारिता एक स्वायत्त घटनात्मक संस्था आहे. निवडणूक आयोगाला भारतीय संविधानाच्या ४ स्तंभापैकी एक मानले जाते. भारतातील निवडणूकीसाठी निवडणूक आयोग सर्वच जबाबदारी आहे. निवडणूक आयोगामध्ये मुख्य निवडणूक आयुक्त आणि राष्ट्पती नेमतील इतके अन्य निवडणूक आयुक्त यांच्यासह एक निवडणूक आयोग बनतो. ऑक्टों इ.स. १९९३ पासून दोन निवडणूक आयुक्त नेमण्याची प्रथा मांडली..

आपल्या देशातील लोकशाही संपूर्ण जगात भक्कम व यशस्वी असल्याचे भारत निवडणूक आयोगाने दाखवून दिलेले आहे. भारत निवडणूक आयोगाची स्थापना २५ जानेवारी १९५० रोजी झाल्याने हा दिवस देशभर राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा केला जातो. १९८९ मध्ये दोन अन्य निवडणूक आयुक्त नेमले होते. मुख्य निवडणूक आयुक्तांना पार पाडण्याचे कर्तव्य लक्षात घेऊन सामाजिक प्रतिष्ठा कायदयाचे ज्ञान आणि समृध्द अशा प्रशासकीय अनुभव असलेल्या व्यक्तीची नेमणूक राष्ट्पती या पदावर करताततत्र सुनिल अरोरा हे २३ वे सध्याचे प्रमुख निवडणूक आयुक्त आहेत.

२)**भारतातील पक्षपध्दतीची वैशिष्ठये :**

**१) राजकीय पक्ष (अनेक पक्ष पध्दती)** :

महाराष्ट्रातील राजकारण हे भारतीय राजकारणावर प्रभाव टाकणारे राजकारण आहे. २०१४ च्या महाराष्ट् विधानसभा निवडणूकीनुसार, राज्यात प्रामुख्याने भाजप कॉग्रेस व राष्ट्वादी कॉग्रेस तीन राष्ट्रीय पक्ष आणि शिवसेना हा एक प्रादेशिक पक्ष असे हे ४ मुख्य भूमिकेतील पक्ष आहेत. २०१८ मध्ये वंचित बहुजन आघाडी या पक्षाची स्थापना करण्यात आली. १५ मार्च २०१९ रोजी भारतीय निवडणूक आयोगाने जाहिर केलेल्या राजकीय पक्षांच्या यादीनुसार महाराष्ट्रात एकूण १४५ नोंदणीकृत पक्ष आणि २ प्रादेशिक / राज्यस्तरीय पक्ष आहेत. तर भारतामध्ये एकूण २,३४४ राजकीय पक्ष, असून यापैकी ७ राष्ट्रीय पक्ष २७ राज्यस्तरीय पक्ष आणि इतर २,३०१ नोंदणीकृत पक्ष आहेत.

कॉग्रेस, तृणमूल कॉग्रेस, राष्ट्रीय कॉग्रेस बहुजनन समाजपक्ष, भारतीय कम्युनिस्ट पक्ष भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) व भारतीय जनता पक्ष असे सात राजकीय पक्ष अखिल भारतीय स्तरावर

मान्यताप्राप्त आहेत. जनतादल युनायटेड, अण्णाद्रमुक, द्रविड मुन्नेत्र कळघम: शिवसेना यासारखे एकूण ५१ राजकीय पक्षांना त्यांच्या राज्यात मान्यता आहे.

**मान्यता नसलेले राजकीय पक्ष.**

| अ.नं. | राज्य | संख्या |
|---|---|---|
| १ | हरियाणा | ६७ |
| २ | पंजाब | ५७ |
| ३ | मध्यप्रदेश | ४८ |
| ४ | गुजरात | ४७ |

**२)पक्ष फाटाफुट :**

संघटनात्मक बांधणीचा अभाव असल्याने एकजुटीने कार्य करणारे प्रभावी संघटना नाही. नेतृत्व, स्पर्धा, तिकीट वाटप, मंत्रीपदाची याज्ञा, व्यक्तीगत हेवेदावे यामुळे संघर्ष निर्माण होवून पक्ष फुटण्याचे प्रमाण जास्त आहे. उदा. कॉंग्रेसचे संघटना कॉंग्रेस, कॉंग्रेस जे समाजवादी फुट पडून संयुक्त समाजवादी प्रजा आणि समाजवादी पक्ष इत्यादी.

**३)पक्षनिष्ठा अभाव :**

भारतीय मतदार संघात विशेषत: राजकीय नेत्यात पक्षनिष्ठतेचा अभाव आढळतो. काही नेते पक्षांतर करताना दिसतात. पक्ष बदलण्याची संख्या फार मोठी झाली आहे. त्यामुळे कोणताच पक्ष प्रभावीपणे कार्य करताना दिसत नाही. कॉंग्रेस पक्ष गेली अनेक वर्षे प्रबळ राजकीय पक्ष म्हणून कार्य करीत असला तरी या पक्षाचे विभाजन झाले आहे.

**४)गटबाजीचे राजकारण :**

भारतात अलिकडे गटबाजीचे राजकारण अधिक वाढलेले दिसते. प्रत्येक राजकीय पक्षात मतभेद आणि गटबाजी आढळून येते. त्यामुळे स्थिर राजकरण संपुष्टात आले आहे. समाजामध्ये विविध प्रकारचे हितसंबंधी गट असतात. त्यांचाही निवडणूकीवर परिणाम होत असतो. उदा. महाराष्ट्रातील शुगर लॉबी.

**५) मतदार इच्छा /आकांक्षांचा प्रभाव :**

भारतीय निवडणूकांवर मतदारांच्या इच्छा आकांक्षाचा फार मोठा प्रभाव पडत असतो. कारण मतदारांना सामाजिक आर्थिक परिवर्तनाची फार मोठी आशा वाटते. प्रत्येक निवडणूकीच्यावेळी मतदार राजकीय पक्षांकडे विशिष्ट अपेक्षेने पहात असतो.

**६)प्रादेशिक पक्षांची वाढ :**

भारतात प्रादेशिक पक्ष वाढ होण्याचे कारण म्हणजे प्रादेशिक पक्षांना स्वातंत्र्यानंतर जास्त महत्व प्राप्त झाले. त्यातून फुटीरवृत्ती वाढत जातात. पंजाबमध्ये हमारा पाणी हमारी बिजली, आसाम मध्ये हमारा तेल हमारी लकडी अशा स्थानिक प्रश्नांना अवास्तव महत्व प्राप्त झाले. अकाली दल आसामगण परिषद, तेलगु देशम अशा प्रादेशिक पक्षांचे महत्व वाढत आहे.

**७)महाराष्ट्रविधानसभा :**

महाराष्ट्र विधानसभा हे महाराष्ट्र शासनाचा द्विस्तरीय प्रांतिक विधिमंडळामधील कनिष्ठ सभागृह आहे. (महाराष्ट्र विधान परिषद हे वरिष्ठ सभागृह) विधानसभेचे कामाकाज मुंबई येथून चालते. विधानसभेची विद्यमान सदस्य संख्या ही २८८ आहे.(महाराष्ट्र, कर्नाटक, उ.प्रदेश, बिहार, जम्मू कश्मीर, आंध्रप्रदेश, तेलंगणा, ओडीशा) या ८ घटक राज्यात द्विगृहात्मक कायदे मंडळ पध्दती अस्तित्वात आहे. बाकी सर्व घटक राज्यात एकगृह कायदेमंडळ पध्दती आहे. तेथे विधानसभा हे एकच सभागृह आहे.

**महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१९**

| अ.नं. | पक्ष | संख्या |
|---|---|---|
| १ | भाजप | १०५ |
| २ | शिवसेना | ५६ |
| ३ | कॉंग्रेस | ४४ |

| | | |
|---|---|---|
| ४ | राष्ट्रवादी कॉंग्रेस | ५४ |
| ५ | मनसे | १ |
| ६ | वंचित बहुजन आघाडी | ० |
| ७ | अन्य | २८ |
| | **एकूण** | **२८८/२८८** |

आज महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक पार पाडली असून सर्वच पक्षांनी मतदारांना आकर्षित करणेसाठी मोर्चेबांधणी सुरू केली होती. देशात महाराष्ट्र आणि हरियाणा राज्यात विधानसभा निवडणूक पार पाडली. दोन्ही राज्यातील निवडणूकीत भाजपा आणि कॉंग्रेस पक्षाची प्रतिष्ठा पणाला लागली होती. भाजपासमोर सत्ता टिकवण्याचे तर कॉंग्रेस समोर अस्तित्व टिकवण्याचे आव्हान दिसून येते.

**निष्कर्ष :**

१. राजकारणातील विविध पक्षांची राजकीय संकल्पना समजावून घेण्यात आले.
२. महाराष्ट्रातील राजकारणावर पडलेला विविध पक्षांचा प्रभाव याची माहिती घेण्यात आली.
३. महाराष्ट्रातील राजकारणातील राज्यव्यवस्थेचा तसेच राजकीय सामाजिक दृष्टीकोनाची माहिती घेण्यात आली.

**समारोप :**

महाराष्ट्रातील राजकारण हे भारतीय राजकारणावर प्रभाव टाकणारे राजकारण असून भारतातील लोकशाहीमध्ये राजकीय पक्षाचा महत्वाचा सहभाग असतो. तसेच राजकीय पक्ष आपली भूमिका वेळोवेळी मांडत असतात. वैचारिकदृष्टया विचार स्वातंत्र्याचे मुल्य सामाजिक, सांस्कृतिक वातावरणात रूजलेले आहे तेथे द्विपक्ष व बहुपक्ष पध्दती रूढझालेली असते. राजकीय पक्षांना त्यांच्या सामर्थ्याच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व मिळावे म्हणून आधुनिक राष्ट्रांमध्ये राजकीय पक्षांची सत्ता ही रूढझालेली आहे.

**संदर्भसूची :**

१. भारतीय राजकारण आणि शासन — प्रा. बी.बी. पाटील फडके प्रकाशन.
२. समाजवादी प्रबोधन प्रकाशन — ज्योती अंक

**वेबसाईट**

1. http//maharashtratimesindia.com
2. https//mr.n.wikipedia.org
3. Loksatta.com
4. https//www.wikiwand.com